Epitome : International Journal of Multidisciplinary Research
ISSN : 2395-6968

# हैदराबाद मुक्तीसंग्राम लढ्यात कै बाबुरावजी काळे यांचे योगदान



प्रा भास्कर टेकाळे
( इतिहास विभाग )
संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव, जि औरंगाबाद( महाराष्ट्र)

## ABSTRACT

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतात असणारे 565 संस्थानांपैकी 3 संस्थाने भारतात विलीन झाले नाही, त्यात काश्मिर जुनागड व हैदराबाद यांचा समावेश होता. यातील हैदराबाद संथान सर्वात प्रभावी होते. हैदराबाद संस्थानात. इ .स 1724 ते 1948 या कालावधीत निजामाची सत्ता होती . मीर कमरुद्दीन हा हैदराबाद संस्थान चा संस्थापक होता.स्वतंत्र्यापुर्वी प्रदिर्घकाळ निजामाची राजवट मराठवाडयातील हिंदूंवर अत्याचार करीत होती. अनियंत्रित एकाधिकारशाही व धर्मानंद त्यामुळे मीर उस्मान अली खानच्या काळात मराठड्यातील जनतेवर मोठ्या प्रमाणात अन्याय अत्याचार वाढले. निजामाच्या या अत्याचारी जोखडातून हैदराबादलामुक्त करण्यासाठी, मुक्तीसंग्राम लढा मराठवाड्यातील जनतेच्या स्वाभिमानातुन हा लढा उभा राहिला होता.

## KEY WORDS

कै. बाबुरावजी काळे, स्वातंत्र्य, निजामाची राजवट, मराठवाड्यातील तरूण, हैदराबाद मुक्तीसंग्राम

 ©EIJMR All rights reserved.

## RESEARCH PAPER

जुलमी रझाकारी राजवटी विरुद्ध सामन्य जनतेने केलेला हा उठाव होता. मराठवाड्यातील तरूणांनी वैचारिक जागृती करण्यासाठी खेडोपाडी निजामाच्या विरुद्ध पत्रके वाटली. जनतेला स्वाभिमानाचे धडे स्वामीं रामानंद तिर्थ यांच्या नेतृत्वाखाली दिले, भारतीय स्वातंत्र्यनंतर हैदराबाद संस्थान भारतात विलीन व्हावे ही येथिल जनतेची मागणी होती. मात्र निजामाच्या महत्वकांक्षी धोरनामुळे हैदराबाद संस्थानाचे भारतीय संघराज्यात विलीनीकरण झाले नाही, आपल्या संस्थानाला स्वतंत्र दर्जा मिळावा या उद्देशाने निजामाच्या सेनापती ने रझाकारी संघटनेला हाताशी धरून मराठवाड्यातील जनतेवर अन्याय अत्याचार करून दहशत निर्माण करून सामान्य जनतेवर जुलूम करण्यासाठी इ. स. 1938 बहादूर यारगंजने हैदराबाद येथे रझाकार नावाची संघटना स्थापन केली. [१]. यानंतर कासीम रझवी हा या संघटनेचा प्रमुख झाला त्याच्या कार्यकाळात मराठवाड्यातील जनतेवर मोठ्या प्रमाणात अत्याचार झाले. हिंदू ची घरे लुटणे, स्त्रीवर अत्याचार करणे, जनतेच्या मालमत्ता लुटणे, प्रतिकार करणाऱ्याला मारणे हे रझाकार चे सरर्सपणे चालू होते. या विरोधात स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली गोविंदभाई श्रॉफ विजेंद्र काबरा, आकृ वाघमारे, भाऊसाहेब वैशंपायन, बाबासाहेब परांजपे, विनायक चारठणकर, माणिकचंद पहाडे, दगडाबाई शेळके, काशिनाथ कुलकर्णी, बाबुराव काळे यांनी तरुणांना संघटीत करण्याचे काम केले.

औरंगाबाद जिल्ह्यात गोविंदभाई श्रॉफ यांच्या नेतृत्वाखाली बाबुराव काळे मराठवाड्यात युवा किंगमेकर म्हणून खेड्या पाड्यात परिचित होते. बाबुराव काळे यांनी येथील जनतेला स्वाभिमानाचे धडे देऊन स्वतंत्र संग्रामात तरुणांची फळी उभी केली. निझामनी केलेल्या अत्याचाराच्या विरोधात सर्व लोकांनी एक संघ झाल्याशिवाय आपल्याला स्वतंत्रय मिळणार नाही. त्या साठी हैदराबाद मुक्तीसंग्राम आंदोलनात महत्त्वाची भूमिका बजावलेल्या वंदेमातरम या चळवळीत 1938 पासून ते तरुणांना संघटीत करण्याचे काम केले.[2] अजिंठा परिसरातील सोयगाव, सिल्लोड, बनोटी, फर्दापुर, पानवळद पलोद, धोत्रा या गावातील आपल्या सहकाऱ्यांना सोबत घेऊन निझाम राजवटी विरुद्ध काम केले, पानवळद च्या भिकाजी पाटील यांच्या सोबत भूमिगत सैनिकांना अन्नधान्य पूरविणे सैनिकांना आश्रय देणे, त्याना हत्यारे, रसद पोहोचविणे हे काम बाबुराव काळे करीत होते. या कामात त्यांना दादा पाटील, चंद्रगुप्त चौधरी, आण्णासाहेब चौबे, पलोदगावं चे गंगाराम मानकर, गोविंद चौबे, जयवंतराव दौड ,धोत्र्याचे गुलाबशिंगं ,नवलशिंग, बाजीराव पाटील, लक्ष्मी नारायण जैसवॉल व दादासाहेब गणोरकर या युवा सैनिकांची साथ मिळाली. हैदराबाद मुक्तीसंग्राम चळवळी मध्ये हे अहोरात्र परिश्रम घेत सामान्य माणसाला रझाकारी सैन्यात विरुद्ध गावोगावी एकत्र करीत गावठी हात

बॉम्ब चालविणे, मुक्तीसंग्रामातील सैनिकांना बंदुकी चालविण्यासाठी शिक्षण देत. [3] निझामाच्या विरोधात गुप्तपत्रके वाटणे निषध पत्रके वर्तमानपत्र गावोगावी सायकलवर फिरून वाटप करीत असताना निजामाच्या सैन्यानी बाबुराव काळे याना पकडले व औरंगाबाद येथील हर्सूल जेलमध्ये राजकिय कैदी म्हणून ठेवले होते. हर्सूल येथील जेल फोडून बाबुराव काळे आपल्या सहकार्यासह शिताफीने बाहेर पडले'. पुढे त्यांनी हैदराबाद स्टेट काँग्रेस मध्ये तसेच आर्य समाज चवळीच्या माध्यमातून मराठवाड्यात मोठं संघटन उभं केलं .[4]

बाबुराव काळे मराठवाड्यातील तरूणाला संघटीत करून हैदराबाद स्टेट काँग्रेस च्या परिषद घेण्यासाठी ते कार्य करीत या कामात त्याचा उद्धवराव पाटील, आनंत भालेराव, आशाताई वाघमारे, काशिनाथ जाधव, व्यंकटराव जाधव, जनार्धन मामा, सूर्यभान पवार, जनार्धन होर्तीकर, जीवनराव बोधनकर, [5] अशा अनेक स्वातंत्र्यसैनिकाशी त्याचा संबंध आला. भारतीय संघराज्यात निजाम आपलं संस्थान विलीन करीत नाही हे पाहून देशाचे गृहमंत्री सरदारवल्लभभाई पटेल यांच्या नेतृत्वाखाली पोलीस ऍक्शन सुरू झाली. भारतीय फौजा हैदराबाद संस्थान च्या चारही बाजूने घुसविल्या. 13 महिन्याच्या लढाया नंतर 13 सप्टेंबर 1948 मध्ये निजाम शरण आला व 17 सप्टेंबर 1948 रोजी हैदराबाद संस्थान भारतीय संघराज्यात सामील झाले' [6].

स्वातंत्र्य लढ्यात ज्यांनी भाग घेतला, ज्याची फारशी नोंद नसलेल्या सर्व स्वातंत्र्य सैनिकाच्या जीवनात स्थर्या प्राप्त करून देण्यासाठी बाबुराव काळे यांनी एक उच्चधिकार समिती स्थापन केली[7] ' या समितीद्वारे खेड्या पाड्यातील नोंद नसलेल्या स्वतंत्रसैनिकांना सन्मानाणे जगता यावे, म्हणून त्याची स्वातंत्र्यसैनिक म्हणून शासन दरबारी नोंदणी या समितीने केली.बाबुराव काळे यांनी मराठवाड्यातील युवा किंगमेकर म्हणून वंदे मातरम चळवळ, हैदराबाद स्टेट काँग्रेस, उच्याधिकार समितीच्या माध्यमातून केलेल्या कार्यामुळे त्याचा तत्कालीन सहकारी हैदराबाद मुक्तीसंग्राम लढ्यातील युवा किंगमेकर '[8] म्हणून उल्लेख करीत असत.

# संदर्भ सूची

1. डॉ बोरकर मंगल सुरेश, हैदराबाद संग्राम व्यक्तिचित्रे, प्रकाशन विभागीय आयुक्त, औरंगाबाद 2008 पृ 42
2. पोतदार वसंत, हैदराबाद स्वत्र्यसंग्राम, वि‍ध्यभारती प्रकाशन, लातुर2006 पू 98
3. कै माजी मंत्री बाबुरावजी काळे व्यक्तीविशेष दैनिक सकाळ लेख 18 ऑक्टोबर 2004
4. कुलकर्णी भुजगराव मराठवाड्याचा विकास अभ्यास व चिंतन पद्मा प्रकाशन औरंगाबाद 1998 पृ 310
5. अनंत भालेराव, हैदराबादचा स्वत्र्यसंग्राम आणि मराठवाडा, मौज प्रकाशन गृह मुंबई 2001, पृ 58,
6. प. नरेंद्र जी एम हैदराबाद मे आर्यसमाज का संघर्ष, सर्व वेदिका प्रकाशन, दिल्ली पृ 75
7. डॉ जोशी पी जी मुक्तीगाथा मुक्तीदाता क्रिएटीव्ह पब्लिकेशन नांदेड 2009 पृ 97
8. अनंत भालेराव उपरोक्त पृ 57

Impact Factor = 4.153 (2018), Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR All rights reserved.